राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तिन्ही स्तरांसाठी (ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद) ई-ग्राम स्वराज पोर्टलवर डीएससी मंजूरी DSC Approval ) साठी मेकर - चेकर ठरविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: पंविआ-२०२०/प्रक्र-५९/वित्त-४**
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१
तारीख : ०९ एप्रिल, २०२१.

संदर्भ .१ -केंद्र शासनाचे क्र.N-१९०११(१६)/८/-e-Panchayat दि. १६ ७.२०२०.चे पत्र
२. शासन निर्णय क्र .पंविआ-२०२०/प्रक्र- ५९/वित्त-४ दि. २६.६.२०२०
३ शासन निर्णय .क्र .पंविआ-२०२०/प्रक्र- ५९/वित्त-४ दि. ४.१२.२०२०

**प्रस्तावना :**

पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार दि.१ एप्रिल, २०२० ते दि. ३१ मार्च, २०२५ या कालावधीत केंद्रशासनाकडून राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी राज्याला अबंधित अनुदान (Basic/Untied Grant) व बंधित अनुदान (Tied Grant) या दोन प्रकारच्या ग्रँटच्या स्वरूपात अनुदान देण्यात येणार आहे. प्रस्तुत निधी हा जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत या तिन्ही स्तरांसाठी उपलब्ध करण्यात येणार आहे. १५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणा-या अनुदान वितरणाबाबतचे सन २०२०-२१ साठीचे निकष व संनियंत्रण याबाबत मार्गदर्शक सूचना देण्याच्या अनुषंगाने ग्रामविकास विभागाने उपरोक्त संदर्भ क्र. २ व ३ येथिल दि.२६.६.२०२० व दि.४.१२.२०२० रोजी शासन निर्णय निर्गमित केले आहेत. राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तिन्ही स्तरांसाठी (ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद) ई-ग्राम स्वराज पोर्टलवर डीएससी मंजुरी (DSC Approval) साठी मेकर-चेकर ठरविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय :**

१. विकास कामांमध्ये जास्तीत जास्त पारदर्शकता असावी याकरीता केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार प्राप्त झालेल्या निधी विनियोजनाबाबतच्या शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केलेल्या

Scanned with CamScanner

कामांच्या देयकांची अदायगी संबंधितांस विहित वेळेत PFMS प्रणालीव्दारे करण्याबाबत केंद्र शासनाकडून राज्यास निर्देश प्राप्त झाले आहेत. यासाठी PFMS- EGramswaraj Integration करण्यात आले आहे .

२. ग्रामपंचायत स्तरावर आपले सरकार सेवा केंद्र, केंद्रीय वित्त आयोग योजनेसंबंधित तांत्रिक सेवा पुरवितात. त्याबद्दलचे पूरक प्रशिक्षणही संबंधितांना देण्यात येते. १४ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत फक्त ग्रामपंचायत स्तरावर निधी वितरित करण्यात आला. त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावरील लोकप्रतिनिधी वरील तांत्रिक बाबींशी अवगत आहेत. परंतु १५ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत प्राप्त निधीचे वितरण पंचायत राजच्या तिन्ही स्तरांवर म्हणजे ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद मध्ये ८० : १० : १० या प्रमाणात करावयाचे असले कारणाने DSC Approval वेळी पंचायत समिती आणि जिल्हा परिषद स्तरावरही मेकर/ चेकर निश्चित करावे लागतील. सध्याच्या Covid-१९ साथरोगाच्या आपत्तीजनक परिस्थितीमध्ये संबंधित लोकप्रतिनिधींना याबाबतचे प्रशिक्षण देऊन अंमलबजावणी करणे ही वेळखाऊ प्रक्रिया होईल.

३. ग्रामपंचायतींबरोबरच पंचायतराजच्या या दोन्ही स्तरांवर (जिल्हा परिषद, पंचायत समिती) करण्यात आलेल्या विकासकामांच्या देयकांची अदायगी विहित कार्यपध्दत अनुसरून छाननीअंती परीपूर्ण आढळल्यास लवकरात लवकर होणे गरजेचे आहे. वरील बाबी लक्षात घेता, पंचायत राजच्या तिन्ही स्तरांसाठी (ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद ) ई-ग्राम स्वराज पोर्टलवर डीएससी मंजुरी (DSC Approval) साठी मा.मंत्री (ग्रामविकास) यांच्या मान्यतेने मेकर-चेकर खालीलप्रमाणे ठरविण्यात आले आहेत. त्यानुसार जिल्हा परिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत स्तरावरील मेकर / चेकर यांचा तपशिल PFMS प्रणालीवर विनचूक काळजीपूर्वक Upload करण्यात यावा.

| अ.क्र. | ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था | मेकर - चेकर |
|---|---|---|
| १ | ग्राम पंचायत स्तर | मेकर - ग्रामसेवक<br>चेकर - सरपंच |
| २ | पंयायत समिती स्तर | मेकर -सहायक लेखा अधिकारी<br>चेकर -गट विकास अधिकारी |
| ३ | जिल्हा परिषद स्तर | मेकर -मुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>चेकर -मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प) |



Scanned with CamScanner

सदर शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२१०४०९१२४४३९२१२० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shashank Yashwant Barve

Digitally signed by Shashank Yashwant Barve
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4f19736b62993d2c7e716a76cdcfdaa8a6a08fc2f15bfd41fed42ec7306bf1e8, cn=Shashank Yashwant Barve
Date: 2021.04.15 11:08:08 +05'30'

(शशांक य. बर्वे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.विधानसभा व विधान परिषद सदस्य.
मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
मा.अति.मुख्य सचिव (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे स्वीय सहाय्यक
महालेखापाल, महाराष्ट्र - १ (लेखापरीक्षा), मुंबई (पाच जादा प्रतीसह)
महालेखापाल, महाराष्ट्र - २ (लेखापरीक्षा), नागपूर (पाच जादा प्रतीसह)
सर्व विभागीय आयुक्त (महसूल)
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
सर्व उपसचिव / अवर सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई
सर्व सहमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व विभाग)
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग (व्यय-१५/अर्थसंकल्प-१७ / वित्त आयोग कक्ष.), मंत्रालय, मुंबई
ग्राम विकास विभाग ( सर्व कार्यासने ), बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई
निवड नस्ती का.क्र.वित्त-४, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई



Scanned with CamScanner